दाखल दिनांक : २९—०५—२००८

नोंदणी दिनांक : २९—०५—२००८

न्यायनिर्णय दिनांक : २१—०३—२०१३

कालावधी : ०४वर्ष—०९म.—२१दिवस

**<u>न्यायदंडाधिकारी,प्रथम वर्ग,न्यायालय क्र.२ भूम यांच्या न्यायालयात</u>**

( पीठासीन अधिकारी ना. मु. जमादार )

**<u>नियमित फौजदारी खटला क्र.७६/२००८</u>** **<u>निशाणी नं.३३</u>**

महाराष्ट्र शासन तर्फे,
फिर्यादी अमोल दिगांबर
कदम, वय २२ वर्ष,
धंदा फोटोग्राफर, रा. भूम,
ता. भूम, जिल्हा उस्मानाबाद.

.. <u>फिर्यादी</u>

—**<u>विरूध्द</u>**—

१) लाला सोपान काळे,
वय ३५ वर्षे, धंदा मजूरी,
रा. पारधीपिडी भूम, ता. भूम,
जि. उस्मानाबाद.

२) मिराबाई लाला काळे,
वय ३५ वर्षे, धंदा घरकाम,
रा. सदर.

.. <u>आरोपी</u>

..

**<u>आरोप</u>**:— कलम ३७९,४२९,२०१ सह ३४ भारतीय दंड विधान अन्वये.

..

श्री. डि.यू. पाटील, सहाय्यक सरकारी विधिज्ञ फिर्यादीकरीता.

श्री. आर.बी. पाटील, विधिज्ञ आरोपी करीता.

..

**न्या य नि र्ण य**

( दिनांक २१ मार्च, २०१३ रोजी घोषीत )

१ प्रस्तुत प्रकरणात आरोपींच्या विरूध्द कलम ३७९,४२९,२०१ सह ३४ भारतीय दंड विधान अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

२ अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालील प्रमाणे:

दिनांक ३१—०१—२००८ रोजी गुरवारी रात्री तीन ते पाच वाजण्याचे सुमारास लाला सोपान काळे, भारत बापू काळे रा. पारधीपिडी भूम हा.मु. वंजारवाडी शिवार यांनी फिर्यादी अमोल कदम याच्या घरासमोरील कोठयात बांधलेला रेडा चोरुन नेवून वंजारवाडी शिवारात लाला सोपान काळे, भारत बापू काळे, मिराबाई भ्र. लाला काळे व वनमाला उर्फ मालनबाई भ्र. लाला काळे यांनी मिळून कापून मांस वाटून घेवून हाडोंग्री शिवारात व वंजारवाडी शिवारात पातेल्यात मांस शिजवून खात होते व उरलेले मांस शेतातील तुराटयावर व खडकावर वाळू घातलेले होते, रेडयाचे मांस कापण्यासाठी वापरलेला सुरा व विळया या तेथेच होत्या, त्यांनी चोरुन आणलेला रेडा लागलीच कापून त्याची विल्हेवाट लावलेली आहे अशी फिर्याद फिर्यादी अमोल कदम याने दिनांक ३१—०१—२००८ रोजी पोलीस स्टेशन, भूम येथे दिली. फिर्यादीवरून गुन्हा रजि. नं.०७/२००८ कलम ३७९, ४२९,२०१ सह ३४ भारतीय दंड विधान अन्वये नोंदवून पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल कांबळे, ब.नं. ७५२ यांनी केला. त्यांनी तपासाअंती आरोपींच्याविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

३ सदर प्रकरणात निशाणी क्र.१ वरील आदेशान्वये आरोपी भारत बापू काळे व वनमाला उर्फ मालनबाई लाला काळे हे सुनावणीसाठी हजर राहत

नसल्याने केवळ आरोपी लाला सोपान काळे व मिराबाई लाला काळे यांच्याविरुध्द प्रकरण वेगळे चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आला.

४ सदर प्रकरणात निशाणी २१ वर आरोपींच्याविरुध्द कलम ३७९, ४२९,२०१ सह ३४ भारतीय दंड विधाना प्रमाणे आरोप निश्चित करण्यात आले. सदरचे आरोप आरोपींना मराठीतून वाचून व समजावून सांगितले. त्यांनी त्यांच्याविरूध्दचे आरोप नाकबूल करून केस पुढे चालविण्याची तयारी दर्शविली.

५ फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१) (ब) अंतर्गत आरोपींची जबानी नोंदवण्यात आली. त्यात त्यांनी घटना पुर्णत: नाकारली आहे. अभियोग पक्षातर्फे श्री.डि.यू. पाटील, सहाय्यक सरकारी विधिज्ञ व आरोपीतर्फे श्री. आर.बी. पाटील, विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐैकण्यात आला.

६ अभियोग पक्षाची हकीकत व कोर्टापुढे आलेला एकुण पुरावा या वरून माझे निदर्शनास खालील प्रमाणे वादाचे मुद्दे उपस्थित होतात ते मुद्दे व त्यावरील निष्कर्ष, कारणे—मिमांसासह पुढील प्रमाणे आहेत.

| **<u>वादप्रश्न</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
| --- | --- |
| १ दिनांक ३१—०१—२००८ रोजी रात्री ३.०० ते ५.०० वाजण्याच्या सुमारास शिवशंकरनगर भूम ता.भूम येथे आरोपी लाला सोपान काळे व मिराबाई लाला काळे यांनी फरार आरोपी भारत बापू काळे व वनमाला उर्फ मालनबाई लाला काळे सह संगनमताने फिर्यादी अमोल दिगांबर कदमच्या मालकीची म्हैस विना परवानगी चोरुन नेल्यामुळे कलम ३७९ सह ३४ भारतीय दंड विधान अन्वये गुन्हा केला ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली आहे काय? | .. नाही. |

| | | |
|---|---|---|
| २ | सदर घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी लाला सोपान काळे व मिराबाई लाला काळे यांनी फरार आरोपी भारत बापू काळे व वनमाला उर्फ मालनबाई लाला काळे सह संगनमताने फिर्यादी अमोल दिगांबर कदमच्या मालकीची रक्कम रु.१०,०००—०० किंमतीची म्हैस हिस जिवे मारल्यामुळे कलम ४२९ सह ३४ भारतीय दंड विधान अन्वये गुन्हा केला ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली आहे काय? | .. नाही. |
| ३ | सदर घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी लाला सोपान काळे व मिराबाई लाला काळे यांनी फरार आरोपी भारत बापू काळे व वनमाला उर्फ मालनबाई लाला काळे सह संगनमताने फिर्यादी अमोल दिगांबर कदमच्या मालकीची म्हैस हिस जिवे मारुन तिचे मांस नष्ट केल्यामुळे कलम २०१ सह ३४ भारतीय दंड विधान अन्वये गुन्हा केला ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली आहे काय? | .. नाही. |
| ४ | आदेश काय झाला? | .. अंतिम आदेशा प्रमाणे. |

## कारणे—मिमांसा

### मुददे क्र. १ ते ४ करीता :—

७ अभियोग पक्षाची अशी केस आहे की, आरोपींनी फिर्यादी अमोल कदमच्या मालकीचा रेडा चोरुन नेवून त्यास ठार मारुन त्याचा पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने वंजारवाडी शिवारात कापून त्याचे मासांचे तुकडे करुन हाडोंग्री शिवारात हरिश्चंद्र पाटील यांच्या शेतातील तुराटयाच्या ढिगा—यावर चोरलेले मांस वाळत ठेवले. आरोपी मिराबाई काळे व वनमाला काळे यांनी कापलेल्या रेडयाचे मांस शिजवून पुरावा नष्ट करण्याकामी सहकार्य केले. या प्रकरणात आरोपी लाला काळे व मिरार्बा काळे हे हजर झाले, त्यांच्याविरुघ्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने केवळ एक साक्षीदार फिर्यादी अमोल

कदम यास तपासलेले आहे. फिर्यादी अमोल दिंगबर कदम याने त्याच्या जवाबात त्याचा काळया रंगाचा रेडा चोरीस गेला होता आणि त्याने शोध घेतला असता हाडोंग्री शिवारात त्यास रेडा कापलेल्या अवस्थेत मिळाला असे सांगीतले आहे, त्यानंतर त्याने आरोपींच्याविरुध्द फिर्याद दिली होती असे सांगतो, मात्र उलट तपासात प्रत्यक्षात म्हैस व रेडा कोणी नेला हे त्यास माहित नाही, तसेच आरोपी लाला सोपान काळे व मिराबाई लाला काळे हे घटनास्थळी हजर होते किंवा कसे याची त्यास माहिती नाही असे सांगतो. तसेच आरोपींच्या सोबत त्याची तडजोड झाली आहे असा जवाबात सांगीतले आहे.

८ प्रथमत: अभियोग पक्षास आरोपीने फिर्यादी अमोल कदमच्या मालकीचा रेडा होता ही बाब पुराव्याअधारे सिध्द करावी लागेल, मात्र एकुणच त्यासंबंधी पुरावा पटलावर नाही, तसेच या आरोपींनी फिर्यादीचा रेडा चोरला या बाबी पुराव्यात आलेल्या नाहीत. यापुढे हांडोंग्री शिवारात मिळालेले मांस हे फिर्यादीच्या रेडयाचेच होते, याबाबतचा पुरावा पटलावर नाही. केवळ एक साक्षीदाराच्या पुराव्यावरुन अभियोग पक्ष याबाबी सिध्द करु शकत नाही. एकुणच अभियोग पक्ष हा आरोपींच्याविरुध्द तोहमत असलेले गुन्हे सिध्द करु शकलेला नाही असे दिसते.

९ फिर्यादी अमोल कदम व आरोपी यांच्यामध्ये तडजोड झाली आहे. फिर्यादीस आरोपींच्याविरुध्द पुरावा देण्यात रस राहिलेला नाही असे दिसते. सबब अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा व तडजोड ही विचारात घेता अभियोग पक्ष आरोपींच्याविरुध्द तोहमत असेलेले गुन्हे सिध्द करु शकलेला नाही. सबब मी वाद प्रश्न क्र.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी देवून वाद प्रश्न क्र. ४ ला खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१ आरोपी क्र.१) लाला सोपान काळे व २) मिराबाई लाला काळे, दोघे रा. पारधीपिडी भूम, ता. भूम. जि. उस्मानाबाद यांची कलम ३७९,४२९,२०१ सह ३४ भारतीय दंड विधान या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२ आरोपींचा जामीन कतबा रद्द करण्यात येतो.

३ निशाणी १ वरील आदेशानुसार इतर फरार आरोपी भारत बापू काळे व वनमाला उर्फ मालनबाई लाला काळे यांच्याविरुध्द प्रकरण चालू ठेवण्यात येत आहे.

(खुल्या न्यायपिठासमोर जाहिर)

स्वाक्षरित/—

दिनांक : २१—०३—२०१३

( ना. मु. जमादार )
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
न्यायालय क्र.२, भुम.